अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । मंगळवार
१५.०९.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २२७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### महिला बाईक रायडरला कारची जोरदार धडक : फरार आरोपी पोलिसांच्या ताब्यात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**गुरुग्राम** - महिला बाईक रायडरला कारने धडक देऊन घटनास्थळावरून फरार झालेल्या आरोपी कल्याण बैन्सला याला मंगळवारी राजस्थानमधील दौसा येथून पोलिसांनी अटक केली आहे. गुरुग्रामच्या गोल्फ कोर्स रोडवर रविवारी सकाळी हा धक्कादायक प्रकार घडला होता.

## राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी, कारखानदारांना दिलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१५ सप्टेंबर) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक पार पडली आहे.



या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहे. यामध्ये राज्य शासनाचा ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन मिळणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत ७ महत्वाचे निर्णय राज्य शासनाचा ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखान्यांना मोठा दिलासा. सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन मिळणार. २०२५-२६ च्या गाळप हंगामातील थकीत एफआरपी देण्यासाठी व आगामी २०२६-२७ च्या गाळप हंगामासाठी कारखान्यांना शासनाकडून पाठबळ मिळणार.(सहकार, पणन विभाग) महाराष्ट्र शासनाच्या २५ प्रमुख धोरण आणि २५ योजनांचे विश्लेषण होणार.

त्यासाठी 'महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक)' स्थापन करण्यास मंजुरी. भारतीय व्यवस्थापन संस्था, मुंबई व योजना व धोरणविषयक संशोधन केंद्र यांच्या शिफारशीनुसार राज्याच्या २५ धोरणांचे तसेच २५ प्रमुख लोककल्याणकारी योजनांचे मूल्यांकन करण्यात येणार.

## गणेशोत्सवाच्या रात्री बेळगावमध्ये काळाचा घाला

## भीषण आगीत एकाच कुटूंबातील चौघांचा होरपळून मृत्यू तर दोघे गंभीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**बेळगाव** - देशभरात गणरायाच्या आगमनाचा उत्साह आणि भक्तिमय वातावरण असतानाच, गणेश चतुर्थीच्याच रात्री बेळगावमधील चव्हाट गल्लीत एक अत्यंत हृदयद्रावक दुर्घटना घडली. एका दुकानाला आणि घराला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील चार जणांचा जागीच होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

एका स्थानिक वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास दमोने यांच्या घरातून अचानक आगीच्या तीव्र ज्वाळा बाहेर पडू लागल्या. काही क्षणांतच आगीने संपूर्ण घराला वेढल्याने आतील लोकांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या दुर्घटनेत गजानन दमोने (६५), शारदा दमोने (४५), भारती दमोने (५०) आणि रोशन दमोने (२१) या चौघांचा दुर्दैवी अंत झाला. तर प्रिया दमोने (२८) आणि गंगा दमोने (२५) या दोघी गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घरातील फ्रिजचा अचानक स्फोट झाल्यामुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीने क्षणात रौद्ररूप धारण केल्यामुळे घरातील सर्व संसार जळून खाक झाला. मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या या परिवारावर कोसळलेल्या या दुःखाच्या डोंगराने संपूर्ण चव्हाट गल्ली परिसर सुन्न झाला आहे. ही दुर्घटना मार्केट पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली असून, पोलिस आणि अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## अकोला-अमरावती महामार्गावर बर्निंग ट्रकचा थरार : भीषण आगीत ट्रक अक्षरशः जळुन खाक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** - अकोला-अमरावती महामार्गावरील कुरुंद गावाजवळ बर्निंग ट्रकचा थरार बघायला मिळाला आहे. अमरावती वरून अकोल्याला माल घेऊन येणाऱ्या ट्रकला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडलीय. यात चालक आणि क्लिनरने वेळीच उडी मारल्याने मोठा अनर्थ टळला आहे. प्राथमिक माहिती नुसार, शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक शक्यता व्यक्त केली जात आहे. या भीषण आगीच्या घटनेनेत ट्रक अक्षरशः जाळून खाक झाला आहे. तर आगीचा भडका उडाल्याने काही वेळ अमरावतीवरून अकोल्याकडे येणारी वाहतूक प्रभावित झाली.



घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात आणण्यात आली असून सध्या वाहतूक सुरळीतपणे सुरु करण्यात आल्याची माहिती आहे.

### 'ज्येष्ठ नेतृत्व काळाच्या पडद्याआड'

## माजी महसूल राज्यमंत्री मदन बाफना यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** - काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, मावळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा माजी महसूल व परिवहन राज्यमंत्री ॲड.मदन बाफना यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी दीर्घ आजाराने सोमवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने मावळसह पुणे जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. आमदार तसेच मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा ठसा मावळच्या राजकारणावर उमटला होता. सर्वसामान्य नागरिक, कार्यकर्ते आणि



विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. बाफना यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात हळहळ व्यक्त होत असून विविध राजकीय नेत्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

आमचे सहकारी आज आमच्यात नाहीत - ज्येष्ठ नेते शरद पवार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, 'आमचे सहकारी मदन शेठ, जे आमच्या सर्वांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले, ते आज आपल्यात नाहीत. वीस वर्षांपूर्वी, महाविकास आघाडीच्या निर्णयांच्या निमित्ताने ते आमच्याशी जोडले गेले. ते अभियांत्रिकीचे शिक्षण घेण्यासाठी पुण्यात आले होते आणि त्याच काळात माझी मदन शेठ यांच्याशी भेट झाली. त्यांच्या अखेरच्या दिवसांपर्यंत ते आमची सोबत कायम होती.'

अनुभवी नेतृत्व काळाच्या पडद्याआड - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि मावळ तालुक्यातील ज्येष्ठ नेते मदन हरकचंद बाफना यांच्या निधनाने दीर्घकाळ सार्वजनिक जीवनात कार्यरत राहिलेले अनुभवी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले.

### गणेशोत्सवाला काळे गालबोट!

## गणेश आगमन मिरवणुकीत भरधाव कंटेनर घुसला : २ शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू

**१२ जखमी, गावात उत्सवावर शोककळा**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**छ.संभाजीनगर** - जिल्ह्यात गणपती आगमन सोहळ्याच्या मिरवणुकीला भीषण अपघातामुळे गालबोट लागले आहे. चित्तेपिंपळगाव-करमाड मार्गावरील पिंप्रीराजा गावच्या वळणावर मिरवणुकीत भरधाव कंटेनर घुसल्याने दुचाकीस्वारांना जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू



झाला असून, १२ जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गणपती आगमन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर गावात मिरवणुकीची तयारी सुरू होती. यासाठी रस्त्यावर नागरिक आणि भाविकांची मोठी गर्दी जमली होती. याचदरम्यान चित्तेपिंपळगाव-करमाड मार्गावरील पिंप्रीराजा गावच्या वळणावर भरधाव कंटेनर मिरवणुकीत घुसला. कंटेनरने रस्त्यावर असलेल्या दुचाकींना जोरदार धडक दिली. या धडकेत काही दुचाकीस्वारांना चिरडत कंटेनर पुढे गेल्याचे सांगण्यात येत आहे. दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू, १२ जखमी या अपघातात विठ्ठल राममाळ जाधव आणि रमेश लहूजी बनसोडे या दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर १२ जण जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी धाव घेतली. जखमींना तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असून, काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

## जनता दरबारात आई-वडिलांची आर्त हाक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात सुरू असलेल्या जनता दरबारात पुण्यातील एका तरुणाचे आई-वडील आपल्या मुलावर झालेल्या अन्यायाची व्यथा घेऊन मोठ्या आशेने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेण्यासाठी आले. ऑनलाइन गेमच्या माध्यमातून झालेल्या वादातून त्यांच्या निष्पाप मुलाला काही तरुणांनी मारहाण केल्याची माहिती त्यांनी दिली.



दरम्यान, प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत त्यांनी तत्काळ पुणे पोलीस आयुक्तांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत आरोपींवर तातडीने कारवाई करून त्यांना लवकरात लवकर अटक करावी आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशा स्पष्ट सूचना दिल्या. तसेच, तरुणाईला चुकीच्या दिशेने नेणाऱ्या आणि हिंसक प्रवृत्तीला खतपाणी घालणाऱ्या ऑनलाइन गेम्सबाबतही आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



### ग्राम वाचनालय हिवरखेडच्या वतीने

# नवोदय विद्यालयात वाचन प्रबोधन कार्यक्रम



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हिवरखेड** – वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी व वाचक सभासद करुन घेण्याकरिता प्रत्येक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व हिवरखेड वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी व वाचक सभासद करुन घेण्याकरिता प्रत्येक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून देण्याकरिता एक तासाचा प्रबोधनाचा कार्यक्रम ग्राम वाचनालय हिवरखेडच्या वतीने नवोदय विद्यालय येथे घेण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्रीकांत विघे, वाचनालयाचे सचिव निंभेकर, ग्रंथपाल अनंतराव फांजे, पंकज भडके, नागदिवे, चव्हाण, परिसे, ईतर शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

याप्रसंगी शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# परभणीत मराठा आरक्षणासाठी शेतकऱ्यानं संपवलं जीवन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**परभणी** – एकीकडे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे गेल्या अठरा दिवसांपासून अंतरवाली सराटीमध्ये उपोषण करत आहेत. तर दुसरीकडे, मराठा आरक्षणाचा प्रश्न अद्याप मार्गी लागत नसल्याने नैराश्यातून पूर्णा तालुक्यातील सुहागन येथील एका मराठा बांधवाने



आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गणेश साहेबराव भोसले असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेमुळे पूर्णा तालुक्यासह संपूर्ण परभणी जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर ठाकरे सेनेचे आमदार राहुल पाटील तसेच शिंदे सेनेचे खासदार संजय जाधव यांनी भोसले कुटुंबीयांची भेट घेवून सांत्वन केले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलने आणि उपोषणे सुरू आहेत. सध्या देखील आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन सुरू असताना सरकारकडून ठोस निर्णय होत नसल्याने गणेश भोसले हे चिंतेत आणि नैराश्यात असल्याचे सांगण्यात येत आहे.

### लंडनमध्ये थेम्स नदीच्या काठावर ऐतिहासिक पहिली 'गंगा आरती'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लंडन** – लंडन येथील प्रसिद्ध थेम्स नदीच्या काठावर रविवारी एक ऐतिहासिक आणि नयनरम्य सोहळा पार पडला. भारतामधील पवित्र गंगा नदीच्या काठावर होणाऱ्या आरतीच्या धर्तीवर थेम्स नदीवर पहिल्यांदाच 'गंगा आरती'चे आयोजन करण्यात आले होते.

'चिन्मय मिशन यूके'च्या ७५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आणि वार्षिक 'टोटली थम्स फेस्टिव्हल'च्या संयुक्त विद्यमाने प्रकाश आणि कृतज्ञतेचा उत्सव' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निसर्ग, ज्ञान आणि चेतनेच्या प्रवाहाचे प्रतीक म्हणून या कार्यक्रमाची संकल्पना मांडण्यात आली होती.

### ध्रितीज किडझी अँड ध्रिती ग्लोबल स्कूल येथे

# बैलपोळा उत्सव उत्साह व पारंपरिक पद्धतीने साजरा



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – ध्रितीज किडझी अँड ध्रिती ग्लोबल स्कूल येथे बैलपोळा उत्सव मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन नगरसेवक तारेश देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विधीवत बैलपूजनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभुषेत तसेच आकर्षक पद्धतीने सजविलेल्या बैलांसह उत्सवात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी रंगीत कागद, फुले व विविध सजावटीच्या साहित्याचा वापर करून बैलांची सुंदर सजावट केली होती. विद्यार्थ्यांचा उत्साह व सर्जनशीलता पाहून उपस्थित मान्यवर व परीक्षकांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी आयोजित बैल सजावट स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण परीक्षकांनी सर्जनशीलता, सजावट, पारंपरिकता आणि सादरीकरणाच्या आधारे केले.

गट अ मधुन मितांशी भुजाडे, मायरा खुटाटे, वियान विटाळकर आणि अर्प्रीत शेंडे प्रांशी लोहिया तर गट ब मधुन वंश कपिले, हंसिका फुसे, भव्या साहू, गोजिरी आढाऊ आणि सानवी शिंगारवाडे हे विजेते ठरले. विजेत्या विद्यार्थ्यांना समीर श्रीराव यांच्या वतीने पारितोषिके प्रदान करण्यात आली. संचालन विनश्री शेळके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका परिनिता जयस्वाल, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### वं.वसंतदास महाराज ग्रामिण बिगर शेती पतसंस्थेच्या वतीने

# गणिततज्ञ सुभाष दाभिरकर यांचा सत्कार



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – भूमितीमधील 'पाय' चे अचुक मुल्य शोधून काढणारे तसेच ३ हजार वर्षाचे कॅलेंडर तोंडपाठ करण्याचा विश्वविक्रम करणारे क्षणार्धात गणित पुस्तकाचे लेखक सुभाष रंगराव दाभिरकर यांचा नुकताच वं.वसंतदास महाराज ग्रामिण बिगर शेती पतसंस्था लोणी यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष गोपाल मालपे यांच्या हस्ते सुभाष दाभिरकर यांना शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी उपाध्यक्ष वासुदेव पोहरकर, योगेश वांगे, लक्ष्मीकांत काळे, अरुण खेरडे, सुधिर ढोले, सुधिर बायमोरे, संजय गुल्हाने, दामोधर आंडे, प्रकाश मालपे, आशा देशमुख उपस्थित होते.

सदर कार्यक्रम वं.वसंतदास महाराज ग्रामिण बिगर शेती पतसंस्था लोणीचे वार्षिक आमसभेत घेण्यात आला असून कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापक प्रविण मेंढे तर आभार योगेश वांगे यांनी मानले.

### महा.राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाच्या वतीने

# जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा : सहभागी होण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हिवरखेड** – महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ, जिल्हा अमरावतीचे वतीने कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ३ ऑक्टोबर मराठी अभिजात भाषा वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध विषयाकरिता निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील–सण, उत्सव आणि मराठी भाषेचा संबंध, मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी, महाराष्ट्रात मराठी विषयाची वर्तमान आणि भविष्यकालीन स्थिती यापैकी कोणत्याही एका विषयावर विद्यार्थ्यांनी स्व–हस्ताक्षरात निबंध लिहून वेळेत पाठवायचे आहेत. निबंध लिहीताना फुलस्केप रेषा असलेल्या किंवा कोऱ्या कागदावर लिहावा, निबंधाची शब्द मर्यादा १००० शब्दांची असावी, निबंध पाठ–पोट लिहिलेला नसावा, निबंधात एखाद्या पुस्तकातील संदर्भ आल्यास त्या संदर्भग्रंथांची नावे लिहावीत, लिहीलेले निबंध ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत खालील पत्यावर स्वहस्ते किंवा पोस्टाने पाठवता येतील.




तयार झालेले निबंध स्पर्धकांनी प्रा.अरुण मेश्राम, श्रीमती नरसम्मा महाविद्यालय, किरण नगर, अमरावती, प्रा.डॉ.दिपाली सांगोले, श्री.आर.आर.लाहोटी कनिष्ठ महाविद्यालय, मोर्शी, प्रा.डॉ.सुभाष पारीसे, महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड, प्रा.ओमप्रकाश ढोरे, शिक्षक कॉलनी, चांदूर बाजार या पत्त्यावर पाठवावीत. विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रमाण पत्र बहाल करण्यात येईल, असे आवाहन आयोजकांच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती येथे

# श्री चक्रधर स्वामी अवतार दिन उत्साहात



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती येथे श्री चक्रधर स्वामी अवतार दिन कृषी उत्पन्न बाजार समिती, सभापती उपसभापती, संचालक मंडळ तसेच तालुक्यातील महानुभाव पंथीय मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन प्रतिमेला हारार्पण करुन चक्रधर स्वामी यांनी १२ व्या शतकात जिवउद्धरणाचे कार्य समाजातील जातीभेद नष्ट करण्याचे कार्य स्त्री पुरुष समानता करण्याचे कार्य तसेच लीळाचरित्र हा ग्रंथ त्यांच्या मुखातून निघालेल्या शब्दातून माहीम भट्ट नागदेवाचार्य यांनी रचला त्या सर्व चक्रधर स्वामींच्या कार्यावर उजाळा देण्यात आला.

या चक्रधर स्वामी अवतार दिन कार्यक्रमाला बाजार समिती सभापती नरेंद्र उर्फ बबलु पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, सर्व संचालक तसेच महानुभाव पंथीय परमपूज्य चौधरी बाबा, युवराज कराळे, विनय चौधरी, दिलीप देशमुख, उज्वल डहाके, प्रदीप बहुरुपी, ओमप्रकाश कराळे, भाकरे, प्रशांत इंगळे, रोशन डहाके, मनोज खसारे, कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव नंदकिशोर बोडखे, कर्मचारी दिलीप धर्मे, मनोज ढोके, विष्णु माकोडे, श्याम ढोंगे, दादाराव अनवाने, सुभाषराव सोनारे, वैभव वाळके, सर्व पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सर्पदंश झालेल्या युवकाचा मृत्यू?

### नातेवाईकांचा ग्रामीण रुग्णालयात ८ तास ठिया : तहसिलदारांची मध्यस्थी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शेतात राहणाऱ्या २८ वर्षीय युवकाचा सर्पदंश झाल्याने उपचार करुन सुटी दिली परंतु पुन्हा अस्वस्थ वाटल्याने रुग्णालयात दाखल झाले. मात्र उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे लक्ष्मणचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप त्यांच्या नातेवाईकांनी करुन मृतदेहाचे शवविच्छेदन न करण्याचा निर्णय घेतल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करुन फॉरेन्सिकचे डॉ.आशिष साळनकर यांनी शवविच्छेदन केले परंतु दोषींवर कारवाही करीता ८ तास ठिय्या दिला.



अखेर तहसिलदारांनी मध्यस्थी करुन पत्र दिल्याने प्रकरण शांत झाले.

प्राप्त माहिती नुसार, मृतक लक्ष्मण भलावी (२८) रा.राजुरा नाका वरुड असे नावं आहे. मृतक लक्ष्मण यांना सर्पदंश झाल्याने शनिवारी पहाटे ४ वाजताच्या दरम्यान उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. डॉक्टरांनी उपचार केल्याने सकाळी ९ वाजता त्याची प्रकृती चांगली असल्याचे सांगून रुग्णालयातून सुट्टी देण्यात आल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. दरम्यान,घरी गेल्यानंतर काही तासांतच पुन्हा लक्ष्मणची प्रकृती पुन्हा खालावल्याने शनिवारी दुपारी ३ वाजताच्या दरम्यान त्याला पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर नातेवाईकांनी रुग्णालयातील डॉक्टरांच्या उपचारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सर्पदंशासारख्या गंभीर प्रकरणात रुग्णाला सकाळीच सुट्टी का देण्यात आली? तसेच उपचाराच्या महत्त्वाच्या काळात संबंधित डॉक्टर उपस्थित होते का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. डॉ.अथर्व काळे म्हणाले की, सर्पदंशाची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक तपासण्या करुन सहा तास निरीक्षणाखाली ठेवले होते. प्रकृती चांगली असल्याने सुट्टी देण्यात आली. साप चावल्यानंतर त्या ठिकाणी सूज आल्याने तो पुन्हा दाखल झाला. उपचारा दरम्यान रिएक्शनमुळे उलटी होऊन छातीत गेल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. डॉक्टरांची हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप मृतकाचे नातेवाईकाने केला. सदर प्रकरणातील सखोल चौकशीची मागणी केली.

यावेळी तहसीलदार रामदास शेळके, ठाणेदार अशोक जाधव, वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार, डॉ.परीक्षित रामपुरे, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, शेंदूरजनाघाट नगराध्यक्षा सुवर्णा वरखडे, नगरसेवक नितेश धुर्वे, भाजपाचे प्रा.कमलनारायण उइके, सतीश धुमटकर, मनिषा उईके, बिरसा क्रांती दलाचे तालुकाध्यक्ष मनोज उईके, नितेश उईके, गजानन धुर्वे, किशोर सलामे, जयपाल कुमरे, विजय उईके, अनुप बेले, उमेश वटके यांच्या उपस्थितीत तहसिलदारांनी मध्यस्थी करुन अखेर दुपारी ४.३० वाजता मृतदेह ताब्यात घेतला.

# संपादकीय

**मन खंबीर असेल तर कोणतेही संकट लहान वाटते.**

## उत्सव आनंदाचा; जबाबदारी सर्वांची

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, श्रद्धेचा आणि सामाजिक ऐक्याचा सर्वात मोठा उत्सव मानला जातो. प्रत्येक गाव, शहर आणि वाड्या-वस्त्यांमध्ये गणरायाच्या आगमनाने उत्साहाचे वातावरण निर्माण होते. ढोल-ताशांचा निनाद, लेझीमची लय, आरतीचा स्वर आणि भक्तांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून जातो. मात्र, याच उत्सवाला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पिंप्रीराजा येथे झालेल्या भीषण अपघाताने काळे गालबोट लागले. भरधाव कंटेनर मिरवणुकीत घुसल्याने दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. आनंदाच्या क्षणात आलेली ही शोकांतिका केवळ एका गावाची नाही, तर संपूर्ण समाजाला अंतर्मुख करणारी घटना आहे. उत्सव साजरा करण्याचा अधिकार जितका महत्त्वाचा आहे, तितकीच त्यामागील सुरक्षिततेची जबाबदारीही महत्त्वाची आहे. आज मोठ्या मिरवणुका, डीजे, प्रकाशयोजना आणि गर्दी यामुळे उत्सवाचे स्वरूप बदलले आहे. परंतु, या बदलत्या स्वरूपाबरोबर सुरक्षा नियोजन त्याच वेगाने वाढलेले दिसत नाही. अनेकदा मुख्य रस्त्यांवर मिरवणुका निघतात, वाहतूक पूर्णपणे नियंत्रित केली जात नाही आणि मोठ्या वाहनांच्या हालचालींवर पुरेसे नियंत्रण राहत नाही. अशा परिस्थितीत एखादी चूकही जीवघेणी ठरते. पिंप्रीराजा येथील दुर्घटनेने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. या घटनेचा तपास सुरू असून अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणे बाकी आहे. कंटेनरचा वेग, चालकाचे नियंत्रण आणि वाहतूक व्यवस्थापन याची चौकशी होईलच; पण त्याचबरोबर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी काय करायचे, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. गणेशोत्सवाच्या काळात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर मिरवणुका काढल्या जातात. अनेक ठिकाणी रस्ते अरुंद असतात, वळणे धोकादायक असतात आणि पर्यायी मार्गांची सोय नसते. त्यामुळे स्थानिक प्रशासन, पोलीस, ग्रामपंचायत आणि गणेश मंडळांनी एकत्रित नियोजन करणे अत्यावश्यक आहे. मिरवणुकीचा मार्ग निश्चित करणे, वाहतूक तात्पुरती बंद करणे, मोठ्या वाहनांना पर्यायी मार्ग देणे, स्वयंसेवकांची नियुक्ती करणे आणि आपत्कालीन वैद्यकीय पथक सज्ज ठेवणे, या गोष्टी औपचारिकता म्हणून नव्हे तर जीव वाचविण्याच्या दृष्टीने कराव्या लागतील. आजच्या काळात तंत्रज्ञानाचाही प्रभावी वापर करता येऊ शकतो. ड्रोनद्वारे गर्दीवर लक्ष ठेवणे, सीसीटीव्हीच्या मदतीने वाहतूक नियंत्रण करणे, तातडीच्या संदेशांसाठी सार्वजनिक सूचना प्रणाली वापरणे आणि नियंत्रण कक्षातून सतत परिस्थितीवर नजर ठेवणे, या उपायांनी धोका कमी होऊ शकतो. मोठ्या शहरांमध्ये अशा पद्धती वापरल्या जात आहेत; आता त्या ग्रामीण भागातही पोहोचायला हव्यात. या घटनेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मृत्यूमुखी पडलेले दोन्ही व्यक्ती शेतकरी होते.

# अवताराची पुर्णता : पंढरपूर वारी ते ऋषीपंचमीचा समाधी योग

साधू-संत हे केवळ देहाने पृथ्वीवर वावरत नसतात तर ते साक्षात परब्रह्माचे सगुण-साकार रूप असतात. भक्तांच्या उद्धारासाठी आणि अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी ईश्वरी इच्छेने संत धरेवर अवतरतात. आपले अवतार कार्य पूर्ण झाल्यावर पुन्हा त्या अव्यक्त ब्रह्मात लीन होतात. श्री संत गजानन महाराजांचा पंढरपूर वारीपासून शेगाव येथील समाधी योगापर्यंतचा प्रवास हा याच अलौकिक ईश्वरी लीलेचा आणि अद्वैत भावाचा एक परमपवित्र अध्याय आहे.

**पंढरीची वारी: सगुण आणि निर्गुणाचा महासंगम**

'जय जय रामकृष्ण इ.स. १९१० चा आषाढ महिना. संपूर्ण पंढरपूर नगरी हरी' च्या जयघोषाने आणि टाळ-मृदुंगाच्या गजराने दुमदुमून गेली होती. विठ्ठलनामाच्या अमृताने सर्व भक्तांची अंतःकरणे न्हाऊन निघाली होती. महाराजांनी हरी पाटील आणि इतर एकनिष्ठ भक्तांसह पंढरपुरात प्रवेश केला. आषाढी एकादशीच्या त्या पावन प्रसंगी चंद्रभागेचे स्नान करुन भक्तांनी विटेवर उभ्या असलेल्या सावळ्या परब्रह्माचे रूप हृदयात साठवले. जाती-भेद वर्ण-भेद विसरुन केवळ शुद्ध भक्तीचा प्रवाह तिथे वाहत होता परंतु या सोहळ्यात एक सूक्ष्म, अलौकिक घटना घडत होती-दोन ब्रह्मांची गुप्त भेट होणार होती.

**विठ्ठलचरणी आर्त प्रार्थना: अवतार कार्याची सांगता**

वारीचा सोहळा पार पडल्यावर २५ जुलै १९१० (श्रावण कृष्ण द्वितीया) च्या प्रशांत वातावरणात महाराज विठ्ठलाच्या राऊळात आले. अनिमिष नेत्रांनी पांडुरंगाच्या श्रीमुखाकडे पाहत महाराजांचा कंठ दाटून आला. डोळ्यांतून आनंदाश्रू आणि विरहाश्रू वाहू लागले. दोन हात जोडून महाराजांनी विठ्ठलाला आर्त साद घातली.

'हे पंढरीनाथा, तुझ्या आज्ञेने पृथ्वीवर भ्रमण करून अज्ञानी जीवांना भक्तीमार्गास



लावले, भक्तांचे मनोरथ पूर्ण केले. आता माझे अवतार कार्य संपले आहे. मला निजधामी जाण्याची आज्ञा व्हावी. भाद्रपद महिन्यात तुझ्या चरणसान्निध्यात अक्षय स्थान मिळावे.' तिथे उपस्थित असलेल्या हरी पाटलांनी विठ्ठलाचा संमतीदर्शक होकार ऐकला. जेव्हा त्यांनी महाराजांना त्यांच्या अश्रूचे कारण विचारले, तेव्हा महाराजांनी गुढ सत्याचा उलगडा केला. 'हा विषय अतिशय खोल आहे. आता आपला सहवास थोड्या दिवसांचाच उरला आहे.'

**शेगाव: पुण्यक्षेत्राचे अमरत्व**

पंढरपूरहून शेगावला परतल्यानंतर महाराजांच्या प्रकृतीत अस्वास्थ्याचे स्वरुप दिसु लागले. भक्तांच्या दृष्टीने ती देहाची व्याधी होती, पण महाराजांसाठी तो निजधामाकडे जाण्याचा मार्ग होता. भाद्रपद शुद्ध तृतीयेच्या रात्री, खोलीत एकटे असताना महाराजांचा पांडुरंगाशी पुन्हा अंतःस्थ संवाद झाला: 'भाद्रपद शुद्ध पंचमीला (ऋषीपंचमी) सुर्योदयाच्या वेळी मला निजधामी जायचे आहे.'

दुसऱ्या दिवशी गणेश चतुर्थीला बाळाभाऊंनी हे वृत्त भक्तांना सांगितले तेव्हा सर्वांची अंतःकरणे हेलावुन गेली. महाराजांनी अत्यंत शांत आणि कारुण्यपूर्ण स्वरात सर्व भक्तांना धीर देत अंतिम उपदेश केला. 'मी पंढरपुरात विठ्ठलचरणी स्थानाची इच्छा धरली होती, परंतु विठ्ठलाची इच्छा शेगावलाच समाधी घेण्याची होती. शेगाव हे साक्षात पुण्यक्षेत्र आहे, हे पक्के जाणून घ्या. साधू-संतांवर अढळ श्रद्धा ठेवा, तुमच्या जीवनात कधीही कशाचीही कमतरता पडणार नाही.'

**समाधी योग: अव्यक्तात विलीन**

ऋषीपंचमीच्या त्या अलौकिक प्रभाती, सूर्योदयाच्या पहिल्या किरणांसोबत महाराजांनी आपले प्राणज्योति परब्रह्मात लीन केली. देहाचे कर्तव्य संपले पण भक्तांवरील कृपाछत्र अखंड राहिले. संत गजानन महाराज आजही शेगावच्या कणाकणात आणि भक्तांच्या हृदयात सूक्ष्म रूपाने वास करत आहेत. 'मी गेलो असे मानु नका, मी तुमच्या पाठीशीच आहे' हा त्यांचा आश्वासक शब्द आजही प्रत्येक भक्ताला धीर देतो.

अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज सद्गुरू श्री गजानन महाराज की जय? 'गण गण गणात बोते!'



**प्रमोद गुणवंतराव दुधे**
**(गजानन भक्त वरुड)**
**मोबा.७९७२५५०५१९**

# राजेश गांधी न्यायप्रवृत्तीचे प्रतीक, शांत स्वभावाचे कर्मनिष्ठ व्यक्तिमत्व

वरुडच्या मातीतून उभे राहिलेल्या समाजसेवेच्या विशाल वटवृक्षाचे आधारस्तंभ, शेतकऱ्यांचे कैवारी, न्यायप्रवृत्तीचे प्रतीक, शांत स्वभावाचे कर्मनिष्ठ व्यक्तिमत्व, कृषी उत्पन्न बाजार समिती वरुड चे संचालक माननीय व आदरणीय राजेशजी गांधी साहेब यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त हृदयापासून शुभकामना! आपले समाजसेवा, शिक्षण, आणि धार्मिक कार्यातील योगदान अविस्मरणीय आहे. श्री हनुमानजी मंदिराच्या जीर्णोद्धारापासून ते गरजूंना सतत मदतीचा हात देण्यापर्यंत, आपले कर्तृत्व प्रत्येकाच्या मनात आदर आणि प्रेरणा निर्माण करते.

**यस्य कृते समाजस्य समृद्धिः संनादति सर्वदा।**
**राजेशः सत्यधर्मस्य दीपः सदा प्रकाशति।।**



ज्यांच्या कृपेने समाज समृद्धीने नादतो, त्या राजेशजी सत्य आणि धर्माचे दीपक सदैव प्रकाशतात.

न्यायाचा दीप उजळला, राजेशजींच्या कर्माने,
शेतकऱ्यांचा आधार तू, सावली तुझ्या प्रेमाने।
हनुमानाच्या कृपेने, तुमच्या कार्याचा गजर,
दीर्घायुष्य लाभो तुला, सदा सुखाचा अंबार!

आपले योगदाना तून वरुडच्या मातीतून उभे केलेले आपले समाजसेवेचे वटवृक्ष आज सर्वांना सावली देत आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून, त्यांना न्याय मिळवून देण्याच्या आपल्या अथक प्रयत्नांनी आणि श्री हनुमानजी मंदिराच्या जीर्णोद्धारासारख्या पवित्र कार्याने आपण प्रत्येकाच्या हृदयात कायमस्वरूपी स्थान मिळवले आहे. शिक्षणप्रेमी, शेतकऱ्यांना न्याय, सर्वांप्रती संप्रभुता आणि उदार व्यक्तिमत्वामुळे आपण समाजात शिक्षण सम्राट म्हणून ख्यातनाम आहात. आपल्या निस्वार्थ कार्याने आणि संयमपूर्ण स्वभावाने समाजाला सतत प्रेरणा मिळते.

विद्या विनयं ददाति,
विनयादब याति पात्रतामब।
✻ पात्रत्वातब धनमाप्नोति, धनातब धर्मः ततः सुखमब।।

विद्या विनय देते, विनयाने पात्रता प्राप्त होते, पात्रतेने धन मिळते आणि धनातून धर्म व सुख प्राप्त होते.

जिथे राजेशजींचा पाय,
तिथे न्यायाचा जयजयकार!
कर्माचे धनी, मनाचे सज्जन, आपले कार्य अमर!
शिक्षणाचा सूरज , समाजसेवेचा तेज, आपल्या कृतीत दिसे सत्य आणि संयमाचा ऐवज!

आज, आपल्या वाढदिवसाच्या शुभ प्रसंगी, वरूड येथील सर्व भाविक, शेतकरी आणि समाजसेवक श्री हनुमानजींच्या चरणी प्रार्थना करतात की, आपणास निरामय आरोग्य, दीर्घायुष्य आणि सतत प्रगती प्राप्त होवो. आपले वैभव, कीर्ती आणि समाजसेवेचा झरा असाच अखंड वाहत राहो!

हनुमान कृपा तुमच्या वर,
✻ सदा राहो तुझ्या संगती,
समाजसेवेचा ध्वज उंच,
✻ तुमच्या कार्याने समृद्धी।
वरूडचा तारा तूच, दीर्घायुष्य लाभो सदा,
✻ राजेशजींच्या चरणी, नतमस्तक आम्ही सर्वदा!
जन्मदिनाच्या अनंत शुभेच्छा!

वरूड येथील सर्व भाविक, शेतकरी आणि समाजसेवक यांच्यावतीने हार्दिक शुभेच्छा.

**नंदकिशोर बोडखे**
**वरुड**

**✻ गणपती बाप्पा मोरया**

# गणरायाचा खरा प्रसाद - माणुसकी

गणेशोत्सव म्हटला की घराघरात आनंद, भक्ती आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष कानावर पडला की मन आपोआप प्रसन्न होते. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकजण या उत्सवात सहभागी होतो. घरातील सजावट, आरती, मोदकांचा सुगंध, मंडपांतील सांस्कृतिक कार्यक्रम आणि विसर्जन मिरवणुकीचा जल्लोष हे सारे गणेशोत्सवाचे अविभाज्य भाग आहेत. पण या सगळ्याच्या पलीकडे गणराय आपल्याला एक मोठा संदेश देतो; तो म्हणजे माणुसकीचा.

भगवान गणेश हे बुद्धी, विवेक आणि समतेचे प्रतीक आहेत. त्यांचे मोठे कान आपल्याला सर्वांचे ऐकण्याची शिकवण देतात, लहान डोळे एकाग्रतेचा संदेश देतात, मोठे पोट सर्वांना सामावून घेण्याची वृत्ती शिकवते आणि सोंड परिस्थितीनुसार लवचिक राहण्याचा आदर्श घालून देते. म्हणूनच गणपतीची पूजा म्हणजे केवळ फुले वाहणे किंवा आरती करणे नव्हे, तर त्यांच्या गुणांचे अनुकरण करणे होय.

आजच्या धावपळीच्या जगात माणूस यशाच्या मागे धावत असताना अनेकदा माणुसकी विसरत आहे. रस्त्यावर एखादा अपघात झाला तर मदत करण्याऐवजी मोबाईलवर व्हिडिओ काढण्याची घाई होते. शेजाऱ्यांच्या दुःखात सहभागी होण्यापेक्षा सोशल मीडियावर शुभेच्छा पाठवणे सोपे वाटते. अशा काळात गणरायाचा उत्सव आपल्याला पुन्हा एकदा समाजाशी जोडण्याची संधी देतो.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला, त्यामागे केवळ धार्मिक



भावना नव्हती. समाज एकत्र यावा, परस्परांमध्ये संवाद वाढावा आणि राष्ट्रीय जाणीव निर्माण व्हावी, हा त्यांचा हेतू होता. आजही अनेक गणेश मंडळे रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, शैक्षणिक मदत आणि सामाजिक जनजागृतीचे उपक्रम राबवतात. हीच खरी गणेशभक्ती आहे.

यावर्षी काही ठिकाणी घडलेल्या दुःखद घटनांनी उत्सवावर शोककळा पसरली. अशा प्रसंगी गणरायाची आरती गाण्याइतकेच महत्त्वाचे आहे दुःखी कुटुंबाच्या पाठीशी उभे राहणे. एखाद्या गरजूला मदतीचा हात देणे, रक्तदान करणे, जखमींना रुग्णालयात पोहोचवणे किंवा संकटात असलेल्या व्यक्तीला धीर देणेहाच खरा प्रसाद आहे.

गणपतीला दूर्वा प्रिय आहेत. दूर्वा साधी असली तरी तिचे महत्त्व मोठे आहे. ती आपल्याला नम्रता शिकवते. समाजातही असेच अनेक साधे लोक असतात, जे कोणताही गाजावाजा न करता इतरांसाठी आयुष्यभर काम करतात. शिक्षक, शेतकरी, सफाई कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, पो-लीस आणि स्वयंसेवकहे समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांचा सन्मान करणे म्हणजे गणरायाला वंदन करणे होय.

पर्यावरण संवर्धन हा देखील आजच्या गणेशोत्सवाचा महत्त्वाचा विषय आहे. शाडूच्या मूर्ती, नैसर्गिक सजावट, प्लास्टिकमुक्त उत्सव आणि जलस्रोतांचे संरक्षण या गोष्टी केवळ घोषणांपुरत्या राहू नयेत. गणपती हा निसर्गाशी एकरूप असलेला देव आहे. त्यामुळे निसर्गाचे रक्षण करणे हीदेखील त्यांची खरी पूजा आहे.

उत्सवात शिस्तही तितकीच आवश्यक आहे. मिरवणुका आनंदाच्या असाव्यात; पण त्यात सुरक्षिततेची जाणीव असणे गरजेचे आहे. वाहतूक नियमांचे पालन, ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण, महिलांचा आणि ज्येष्ठांचा सन्मान आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण या गोष्टी प्रत्येक भक्ताने स्वतःहून स्वीकारल्या पाहिजेत.

गणराय प्रत्येक वर्षी येतात आणि दहा दिवसांनी निरोप घेतात. पण ते जाताना आपल्यासाठी एक प्रश्न ठेवून जातातमी तुमच्या घरी आलो, पण माझे गुण तुमच्या मनात राहिले का? जर उत्तर हो असेल, तरच गणेशोत्सव यशस्वी झाला असे म्हणता येईल.

यंदाच्या गणेशोत्सवात आपण एक छोटा संकल्प करूयादररोज किमान एक चांगले काम करू. एखाद्या गरजूला मदत करू, वृद्धांची चौकशी करू, झाड लावू, रक्तदान करू किंवा एखाद्या मुलाच्या शिक्षणासाठी हातभार लावू. कारण देवाला सर्वांत प्रिय अर्पण फुले किंवा मिठाई नसते; तर करुणा, सेवा आणि माणुसकी असते.

गणरायाच्या चरणी आपण सर्वांनी हीच प्रार्थना करूया हे विघ्नहर्त्या, आमच्या जीवनातील अहंकार दूर कर. बुद्धीला विवेक दे, मनात करुणा दे आणि समाजासाठी जगण्याची प्रेरणा दे. आमच्या घरात सुख-समृद्धी येवो; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्येकाच्या मनात माणुसकीचे दिवे कायम तेवत राहोत.

**गणपती बाप्पा मोरया!**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

अमरावतीच्या जाधव कुणबी समाज भवन येथे २ ऑक्टोंबर रोजी

# जाधव कुणबी समाज कृषिभूषण पुरस्कार व शेतकरी मेळावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – अमरावतीच्या जाधव कुणबी समाज भवन येथे २ ऑक्टोंबर रोजी जाधव कुणबी समाज कृषिभूषण पुरस्कार व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जाधव कुणबी समाज हा बहुसंख्येने शेतीवर अवलंबून आहे. समाज बांधवांनी इतर क्षेत्रात प्रगती करत असतांना कृषी क्षेत्रात सुद्धा दमदार प्रगती केल्याचे दिसुन येते. समाजातील बऱ्याच शेतकऱ्यांना शासनाचे तसेच इतरही मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या सर्वांचे कौतुक होणे क्रमप्राप्त आहे. करिता समाजातील अशा सर्व पुरस्कारार्थी आणि त्यांचेसोबत समाजातील प्रतिथयश, प्रगतीशील आणि होतकरु शेतकऱ्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने कै.पुरुषोत्तमजी कळसकर स्मृती सभागृह, जाधव कुणबी समाज भवन अमरावती येथे सत्कार समारंभ आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन येत्या २ ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे. समाजातील प्रगतीशील शेतकरी बंधू भगिनींनी या उपक्रमात सहभागी व्हावे, अशी आयोजकांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे तसेच या सोहळ्यात शेतकरी हितार्थ काम करणाऱ्या समाजातील पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रपत्र तयार करण्यात आले असून इच्छुक शेतकरी बंधू भगीनीनी हे प्रपत्र भरून आवश्यक कागदपत्रासाहित २० सप्टेबर २०२६ पर्यंत आयोजकांकडे पोहोचवावित. आयोजन समितीत विभागवार सदस्य असून अनिल तट्टे ९४२२०१५१६१, राजेंद्र जाणे ९०९६८५५९२३, अतुल कळसकर ९०२१५७३५७१, दिलीप भड ९४२२१५९१९४, अरविंद तट्टे ९९७५१४२५२९, चिंधू दुगाने ९४२१७०८४७४, राजेश देशमुख ८९५४३३६७४२, गिरीधर खुजे ९८८१९१४८२७, पुष्पक खापरे ९८८१५२८४३३, शशिकला खापरे९८५०१५३०१९, प्रफुल्ल हेलोडे ९८९०९५२४१६, दिपक सोनारे ९४२२८०९४७०, मंगेश देव्हाते ९९६०२३६४५०, तुषार निकम ९४२१७८५४४७, धीरज निकम ९४०४२७११८५, रवींद्रपंत जाणे ९८९०२९४७३४, जितेंद्र शेटे ९६०४५७५२९५, छाया देशमुख ९४२२०३४४९६, प्रमोद ईखे ९८५०१०१३२९ यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# विसर्जन सुरक्षित पार पडण्यासाठी दक्षता घ्या!

## अतिरिक्त आयुक्त डॉ.ढाकणे यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – श्रीगणेशोत्सवासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून विविध सेवा-सुविधांसह सुसज्ज तयारी करण्यात आली आहे. गणेश मूर्तीचे विसर्जन सुरळीत व सुरक्षित पार पडावे यासाठी विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ.अविनाश ढाकणे यांनी दिले.

डॉ.अविनाश ढाकणे यांनी रविवारी मुंबई शहर, पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरातील विविध विसर्जन स्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून तयारीचा आढावा घेतला. यावेळी सह आयुक्त (परिमंडळ ४) डॉ. भाग्यश्री कापसे, उप आयुक्त (परिमंडळ २) तथा श्रीगणेशोत्सव समन्वयक प्रशांत सपकाळे, डी विभागाचे सहाय्यक आयुक्त संतोष साळुंखे, के पश्चिम विभागाचे सहाय्यक आयुक्त चक्रपाणी अल्ले, एस विभागाच्या सहाय्यक आयुक्त समरिन सय्यद आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुंबई शहर विभागातील गिरगाव चौपाटी, दादर चौपाटी आदी विसर्जन स्थळांवर महानगरपालिकेने केलेली पूर्वतयारी, उपलब्ध नागरी सेवा-सुविधा तसेच गणेशभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची डॉ.ढाकणे यांनी पाहणी केली.

ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांवर

# अंडवृद्धी, हर्निया, अपेंडिरक व सामान्य शस्त्रक्रिया

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – ग्रामीण रुग्णालय येथे महात्मा फुले जन आरोग्य योजना व केंद्र शासनाच्या आयुष्यमान भव योजना या अंतर्गत २५ रुग्णांवर अंडवृद्धी व पोटाचा हर्निया, अपेनडिस्क व सामान्य शस्त्रक्रिया संपन्न झाल्या.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रमोद पोतदार, डॉ.परिक्षीत रामपुरे, शल्यचिकित्सक डॉ.प्रविण बिजवे, डॉ.राहुल खन्ना, डॉ.गोपाल कापसे, भुलतज्ञ डॉ.पकंज बिजवे, डॉ.हर्षाली पावडे, डॉ.जगदीश काळभोर, डॉ.अश्विनी वंजारी यांनी शिबिराकरिता परिश्रम घेतले. हे शिबिर ग्रामीण रुग्णालय येथील डॉ.हेमंत वैष्णव, वरुड व मोर्शीचे वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम मानकर, राखी कदम, प्राजंली खेरडे, संदीप पवार, सागर झटाले, अक्षय सोनवणे, सुनील नांदगावकर, कुणाल इमले, ललिता गवई , शालु खंडारे, महात्मा जोतिराव फुले जन व आयुष्यमान भारत जनआरोग्य योजनेतील राजेंद्र सावळकर, जिचकार, विशाल चौधरी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी शिबिराच्या यशस्वितेकरीता अथक परिश्रम घेतले.

माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महा.येथे

# संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***लोणी*** – माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय येथे महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यार्थ्यांमधून दक्ष रोकडे, ध्रुव ठाकरे, पूर्वी धोटे, नंदिनी हिवसे प्रमुख अतिथी तथा पालक शिक्षक संघाचे सदस्य अनिल हिवसे, मुख्याध्यापिका एस.एम.दुर्योधन, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन हारार्पण दीपप्रज्वलन करुन प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी नंदिनी हिवसे, पूर्वी धोटे, राघीनी वानखडे, माही हिवसे, राही हिवसे, संस्कृती राऊत या विद्यार्थ्यांसह आर.डी. सोळंके, एस.डी.वंजारी व एस.एम.दुर्योधन यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक के.आर.नेरकर, संचालन एम.आर.भालेकर तर आभार एल.व्ही.चिंचे यांनी मानले.

# नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.२ येथे तान्हा पोळा बैल सजावट स्पर्धा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***शेंदुरजनाघाट*** – नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.२ तसेच नगरपरिषद व्हिजन कॉन्व्हेंट ऑफ स्कॉलर यांच्या संयुक्त विद्यमाने तान्हा पोळा बैल सजावट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उदघाटन नगराध्यक्ष सुवर्णा वरखडे यांनी वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून केले. न.प.शिक्षण सभापती निलिमा कुबडे, नगरसेवक योगेश उर्फ विजय चौधरी यांनी दीपप्रज्वलन करुन केली. स्पर्धा उदघाटन पश्चात सर्व विद्यार्थ्यांनी तान्हा पोळ्यात बैल सजवुन उत्स्फूर्त असा सहभाग नोंदविला. या स्पर्धेच्या परीक्षणाकरिता परीक्षक रश्मी मुळे, शुभम अकर्ते यांनी अत्यंत पारदर्शी व सूक्ष्म निरीक्षण करुन निकषाधारीत मुल्यमापन केले. कार्यक्रमारंभी मुख्याध्यापिका किर्तीमाला धुर्वे यांनी केले. कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश कपले, उपाध्यक्ष प्रणिता चापले, सदस्य लक्ष्मीकांत तायडे, प्रीती रगडे, लोकेश कटारे व मोठ्या प्रमाणात पालक सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विजयकुमार इंगळे तर विजय राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता शिक्षक हेमंत धानोरकर, नितीन गायकवाड, रीना पुरी, वैशाली सुपले, रंजना पारसे, ज्योती खोब्रागडे, प्रियंका डोंगरे, सुरेश माळोदे आदींनी प्रयत्न केले.

# खोटेपणापुढे सत्याचा विजय : राजरस्थानमधील पंचायत निवडणुका जिंकल्यानंतर पंतप्रधान मोदी काय म्हणाले?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***नवी दिल्ली*** – राजस्थान पंचायत निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय नोंदवला आहे. या घवघवीत यशावर आनंद व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले असून, 'हा कौल म्हणजे असत्याच्या आव्हानावर सत्याने मिळवलेला विजय आहे,' अशी प्रतिक्रिया दिली आहे. या निवडणुकीत राजस्थानच्या जनतेने डबल इंजिन सरकारच्या सुशासन आणि विकास धोरणांवर पुन्हा एकदा विश्वासाची मोहोर उमटवली असल्याचे पंतप्रधान मोदींनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 'माझ्या परिवारातील सदस्यांनी दिलेल्या या जनादेशामुळे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे की, सुशासन आणि विकासाच्या धोरणांना जनतेचा पूर्ण पाठिंबा आहे. राज्याला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेण्याचा आणि जनसामान्यांचे जीवन समृद्ध करण्याचा आमचा संकल्प यामुळे अधिक बळकट होईल.

श्री यशवंतबाबा देवस्थान कमिटी व मित्रपरिवाराच्या वतीने

# राजुरा बाजारमध्ये तान्हा पोळा : बक्षिसांची लयलुट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – राजुरा बाजार येथील श्री यशवंतबाबा देवस्थान कमिटी व मित्रपरिवाराच्या वतीने यावर्षी तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बक्षिसांची लयलुट करण्यात आली.

श्री यशवंतबाबा देवस्थान कमिटी व मित्र परिवाराच्या वतीने मंदिर परिसरात तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १०० च्यावर चिमुकल्यांनी सहभाग नोंदविला.

या तान्हा पोळ्यात चिमुकल्यानी विविध देखावे सादर केले. उत्कृष्ठ वेशभुषा करुन चिमुकले आपल्या नंदीसह सहभागी झाले होते. यावेळी प्रियल सतिश बहुरुपी याला प्रथम बक्षीस देऊन गौरविण्यात आले तर देवांश पोहकार याला द्वितीय व कैवल्य प्रविण बहुरुपी व मनस्वी भगवंत बहुरुपी यांनी तृतीय बक्षीस विभागुन देण्यात आले.



या व्यतिरिक्त भूमिक सुरजुसे, युवांशी बहुरुपी, स्वप्नील बावणे,रिधान वाघ, अनुश्री शिरभाते, गार्गी भोंडे, रेवा देशमुख या चिमुकल्याना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. या तान्हा पोळ्याच्या यशस्वितेसाठी सचिन आंडे, प्रविण नथीले, सागर भोंडे, निलेश गोमकाळे, जगदीश भोरे, प्रमोद वाघ आदींनी प्रयत्न केले.

स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाात

# महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी जयंती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे संस्थापक व राजे संभाजी महाराज शिक्षण संस्थेचे सचिव मोहन पावडे यांचे हस्ते दीपप्रज्वलन करुन चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यास माल्यार्पण करण्यात आले. प्राचार्य डॉ.साजिद अन्वर यांनी तुळशीचे रोपटे व पुष्पगुच्छ देऊन मोहन पावडे यांचे स्वागत केले तर डॉ.साजिद अन्वर यांचे स्वागत प्रा.डॉ.विवेक देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्तविकात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद तट्टे यांनी चक्रधर स्वामींनी जातिभेद, वर्णभेद मानणाऱ्या परंपरांना विरोध करुन सर्वसामान्यांना व स्त्रियांना भक्तीचा व मोक्षाचा समान अधिकार दिल्याचे संगितले. मोहन पावडे यांनी चक्रधर स्वामी यांच्या लीळांचे वर्णन असलेल्या लीळाचरित्राचे अध्ययन करुन त्यांचे विचार आत्मसात करण्याचे उपस्थितांना आवाहन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.डॉ.अनिल कडू , प्रा.डॉ.प्रदीप ढोले, प्रा.डॉ.मनोज राठोड, प्रा.डॉ.लीना गावंडे, ग्रंथपाल डॉ.कविता इंगळे, आशिष लुंगे, प्रफुल किटुकले, इंदिरा खेरडे व मोठ्या संख्येने रासेयो स्वयंसेविका उपस्थित होत्या.

# हातुर्णा येथे बैलपोळा उत्साहात साजरा

## टिपिन डब्बा भेट देऊन शेतकऱ्यांचा केला सत्कार



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील हातुर्णा येथे बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

हातुर्णा येथे हनुमान चौक येथे बैलपोळा भरविण्यात आला. यावर्षी निसर्गाने मोठ्या प्रमाणात पाण्याचा खंड दिला तरी शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी गावातील सर्व शेतकरी सायंकाळी गावातील हनुमान मंदिर देवस्थान येथे एकत्र येऊन आपल्या सजविलेल्या बैल धुवून पोळ्यात सहभागी झाले.

यावेळी सर्व शेतकऱ्यांना आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या तर्फे टिफीन डब्बा व नारळ दुप्पट भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. गावातील मानाचा घाट अण्णाजी ठाकरे पाटील यांच्या हस्ते घाटाचे वाटप करण्यात आले. गावातील विनोद ठाकरे, पोलिस पाटील प्रकाश गोहत्रे, पंकज ठाकरे, अमित गांधी, मंगेश कोरडे, वामनराव ठाकरे, रामदास जवादे, मोहन ठाकरे, नरेश ठाकरे, दिपक पोहणे, हेमंत देशपांडे, अमोल ठाकरे, विलास रामटेके व गावातील सर्व शेतकरी उपस्थित होते.

# आदर्श मराठी प्राथमिक शाळेत तान्हा पोळा उत्सव व बैल सजावट स्पर्धा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था वरुड द्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक शाळेत तान्हा पोळा उत्सव व बैल सजावट स्पर्धा मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाकरिता मुख्याध्यापक नितेश वाघमारे, शिक्षिका सुजाता लेकुरवाळे, डॉ.मिना बंदे आदर्श इंग्लिश स्कूलच्या जेष्ठ शिक्षिका अपर्णा देशमुख, कविता चौधरी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात जगाचा पोशिंदा नंदी बैलाचे पूजन करुन करण्यात आली. या दरम्यान सर्व चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना साजेशी परंपरागत वेशभूषा तसेच विद्यार्थिनींनी महिला शेतकऱ्याची वेशभूषा करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध आकर्षक बैलांच्या प्रतिकृती व सजावटीने कार्यक्रमाचे विशेष आकर्षण वाढले. यावेळी वर्ग तिसरा वा चौथीच्या विद्यार्थ्यांनी 'सुरु झालीया पेरणी' या सुंदर गाण्यावर





अप्रतिम नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता सांस्कृतिक उत्सव समिती प्रभारी नम्रता बेलोदे, निखिल कुबडे, सोनाली खेडकर, समीक्षा कुबडे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.



**वरुड** : सावंगी येथील मुळं राहिवाशी डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे यांचे बैल पोळ्यातील बैल जोडीसोबत आर्ट ऑफ लिव्हिंगचे विदर्भ समन्वयक अशोक नानोटकर, मनसोपचार तज्ञ डॉ शिवा पुंडकर, राजेंद्र दोहाते, दिलीप गावंडे, आशिष धोटे.



**वरुड** : येथुन जवळच असलेल्या टेंभुरखेडा येथील उमेकर कुटूंबियांनी बैलजोडीची पुजाअर्चा करुन पोळा साजरा केला. याप्रसंगी वकिल संघाचे माजी अध्यक्ष ॲड.शशिकांत, डॉ.शशिभुषण, नरेश उमेकर, मातोश्री सुमन व इतर.

# नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.१ येथे मातीची मूर्ती बनविणे आणि बैल सजावट स्पर्धा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१ येथे गणेशोत्सव व पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक मातीची गणपती मूर्ती बनविणे स्पर्धा आणि बैल सजावट स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण व्हावी आणि संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेत शाळेतील इयत्ता नर्सरी ते पाचवी च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. मातीच्या गणपती मूर्ती स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा वापर टाळून स्वतःच्या हाताने सुंदर व आकर्षक मातीच्या मूर्ती साकारल्या तसेच पोळा सणाचे औचित्य साधून आयोजित बैल सजावट स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मातीचे बैल तयार करून त्यांना आकर्षक रंगांनी व झुल-बाशिंगाने सजवले.

याप्रसंगी नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले. कार्यक्रमासाठी शाळेचे प्र.मुख्याध्यापक आशिष तडस, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. विलास रामटेके व गावातील सर्व शेतकरी उपस्थित होते.

## गणपतीला दूर्वा का अर्पण करतात?



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

– पौराणिक कथेनुसार, अनलासूर नावाच्या असुराचा संहार केल्यानंतर श्रीगणेशाच्या शरीरात प्रचंड उष्णता निर्माण झाली. तेव्हा ऋषींनी त्यांच्या मस्तकावर दूर्वा अर्पण केल्या आणि त्यांची जळजळ शांत झाली. तेव्हापासून गणेशपूजेत दूर्वा अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली, अशी श्रद्धा आहे.

**२१ दूर्वांचे महत्त्व**

गणपतीला सामान्यतः २१ दूर्वांच्या जुड्या वाहिल्या जातात. धार्मिक परंपरेनुसार ही संख्या २१ प्रकारच्या दुःखांपासून मुक्ती आणि कार्यसिद्धीचे प्रतीक मानली जाते. दूर्वा ताज्या, हिरव्या आणि तीन किंवा पाच पानांच्या जुडीत असाव्यात.

**दूर्वेचे प्रतीकात्मक महत्त्व**

दूर्वा हे साधेपणा, नम्रता, चिकाटी आणि सातत्याचे प्रतीक मानले जाते. सर्व ऋतूंमध्ये हिरवे राहणारे हे गवत संकटातही टिकून राहण्याचा संदेश देते. त्यामुळे गणरायाला दूर्वा अर्पण करणे म्हणजे विनम्रतेने यश आणि समृद्धीची प्रार्थना करणे, असा भाव व्यक्त केला जातो.

# लातूरचे प्रसिद्ध संस्थाचालक संजीव सोनवणे यांनी राहत्या घरी संपवलं जीवन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**लातूर** – शहरातील प्रसिद्ध शिक्षण संस्थाचालक संजीव सोनवणे (डरपक्षशर्शी डेपुरुपश ऊशरींह) यांनी राहत्या घरी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. मंगळवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर लातूर शहरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.पंचनामा आणि पुढील तपास सुरू केला आहे. कुटुंबीय परदेशात गेले असताना संजीव सोनवणे हे घरी एकटेच असल्याची माहिती आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, या चिठ्ठीतील मजकूर आणि घटनेमागील नेमके कारण याबाबत अधिकृत तपासानंतरच स्पष्टता येणार आहे.

संजीव सोनवणे यांचा शैक्षणिक क्षेत्रातील मोठा प्रवास- संजीव सोनवणे यांचा शैक्षणिक क्षेत्रातील प्रवास मोठा आहे. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे शिक्षण त्यांनी बेंगळुरू येथील सिद्धगंगा कॉलेज, तुमकुर येथे घेतले. त्यांचे वडील चंद्रभानू सोनवणे हे औरंगाबाद विद्यापीठात हिंदी साहित्याचे प्रमुख होते.

## एच.के.एम.उर्दू हायस्कूल येथे

# डॉ.राधाकृष्णनांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणुन साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – स्थानिक मील्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन शेंदूरजनाघाट द्वारा संचालित एच.के.एम.उर्दू हायस्कूल येथे भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयात विद्यार्थ्यांच्या स्वयंशासित विद्यालयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यालयातील अब्दान आदील अब्दुल कलीम, हजीरा आफरीन मोहम्मद नईम शेख, मो.उजैर अब्दुल माजिद, फातिमा सारिया, जुबिया कौसर, फजीलाअनम, गौसिया नाज, आलिया वसीमशा अदिबा कौसर, माहिन नाज, आलिया जरीन, आयेशा सिद्दीका, सना फिरदोस, अक्सा फातेमा, अदीबा नाजीमखान, अजरा जमील, ईशरा आमिर, अश्मीरा सदफ, तंजीला सिद्दीक, लिमा मो.निसार, नवेरा, नबीला मरशदा, हम्माद खान, अर्शदखान इत्यादींनी शिक्षकांची वेशभूषा धारण करुन शिक्षकांची भूमिका साकारली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे स्वागत कार्यक्रमाचे नियोजन तसेच शिक्षकांच्या भूमिकेचे सादरीकरण अत्यंत सुंदर पद्धतीने केले तसेच शिक्षकांच्या सन्मानासाठी आयोजित कार्यक्रमात हुजेफ अहमद, रोजीया तबसुम, निसबा कौसर, आलिया फिरदोस, अलिशबा फातिमा, अश्फिया खानम, माहीन कौसर, फिरदोस फातिमा, सैफखान,तंजीला अंजूम या विद्यार्थ्यांनी डॉ.राधाकृष्णन यांच्या जीवनाविषयी माहिती तसेच शिक्षकांप्रतींच्या भावना आपल्या भाषणातून व्यक्त केल्या.

सय्यद सादिक, मिर्झा शहजाद अख्तर, नईम अहमद, फरीदा यास्मिन इत्यादी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नईम शेख जरूडकर होते.तर अब्दुल कलीम प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन व आभार फजीला वसीमशाह व जुबिया कौसर यांनी केले.

नाझीम खान व तौफिक अहमद यांचे कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी सहकार्य लाभले.

# मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाचा अभिजीत दीपके यांचा 'राजीनामा'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**भोपाळ** – बालाघाट जिल्ह्यात झालेल्या आदिवासी मुलांच्या मृत्यूच्या घटनेवरून 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी रविवारी मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या सरकारवर उपरोधिक टीका केली. त्यांनी ''मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा' देत असल्याचे सांगणारे एक उपरोधिक पत्र 'एक्स'वर पोस्ट केले. या पत्रात दीपके यांनी, 'बालाघाटमध्ये ३० हून अधिक आदिवासी मुलांचा मृत्यू झाल्यानंतर या खुर्चीवर राहण्याची माझी सदसदविवेकबुद्धी मला परवानगी देत नाही,' असे नमूद करत आपण राजीनामा देत असल्याचे म्हटले आहे. मध्य प्रदेशातील जनतेची सेवा करण्याची 'संधी' दिल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही या उपरोधिक पत्रातून आभार मानले. या उपरोधिक पत्रातून दिपके यांनी बालाघाटमधील मृत्यूंच्या प्रकरणी सरकारने केलेल्या हाताळणीवर, विशेषतः मृतांच्या कुटुंबीयांसाठी जाहीर केलेल्या मदतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'जर मृत्यू झालेले मुले मंत्री किंवा आमदारांची असती, तर २४ लाख रुपयांची भरपाई पुरेशी ठरली असती का?' असा सवालही त्यांनी केला.



**वरुड** : येथील नवीन रिंग रोड व मोर्शी बायपासच्या प्रलंबित कामांना गती मिळावी, यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याशी १३ सप्टेंबरला सकारात्मक चर्चा करतेवेळी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर. लवकरात लवकर कामे मार्गी लावण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याबाबत यावेळी आश्वासनात्मक संवाद झाला.

# राज्य सरकार हिवाळी अधिवेशनात यूसीसी विधेयक मांडण्याच्या तयारीत : देवेंद्र फडणवीस

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – समान नागरी संहिता (युसीसी) संदर्भातील मसुदा समितीचा अहवाल प्राप्त होताच राज्यात त्याची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

फडणवीस म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील सात सदस्यीय समिती यासंदर्भातील शिफारशींवर काम करत आहे. नागपूर येथे होणाऱ्या राज्य विधानसभेच्या आगामी हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडण्याचा सरकारचा मानस आहे.

समितीचे काम वेगात भाजपप्रणीत रालोआ (एनडीए) सरकारे असलेल्या २१ राज्यांमध्ये २०२९ पूर्वी समान नागरी संहिता लागू केली जाईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी फडणवीस यांनी हे वक्तव्य केले आहे. समितीने अहवाल सादर करताच आम्ही अंमलबजावणीच्या दिशेने पावले उचलू, असे फडणवीस म्हणाले. राज्य सरकारने जुलै महिन्यात या समितीची स्थापना केली असून शिफारशी सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत दिली आहे. या समितीत निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या व्यतिरिक्त माजी उच्च न्यायालयीन न्या. आर. सी. चव्हाण आणि एस. जी. मेहरे, माजी मुख्य सचिव डी. के. जैन, माजी महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, राज्यघटना तज्ज्ञ रमेश पतंगे आणि शिक्षणतज्ज्ञ सुवर्णा रावळ यांचा समावेश आहे.

### श्री विश्वकृपा आयुर्वेदीय चिकित्सालय व पंचकर्म केंद्राच्या माध्यमातून

# डॉ.सोनारे यांच्या संशोधनाची जागतिक पातळीवर दखल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – डॉ.वैद्य चरणदास सोनारे हे नाव आज केवळ वरुड-अमरावती किंवा पुणे-नागपूर पुरते मर्यादित राहिलेले नाही. आयुर्वेदाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा ग्रंथाधारित, अनुभवाधारित आणि संशोधनावर आधारित आहे.

श्री विश्वकृपा आयुर्वेदीय चिकित्सालय व पंचकर्म केंद्राच्या माध्यमातून गेली २१ वर्षे ते आयुर्वेद आणि पंचकर्म सल्ला सेवा देत आहेत. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक रुग्णाची प्रकृती, ऋतु, आहार-विहाराचा सखोल विचार करुन दिला जाणारा सल्ला.

**संशोधनाची वाटचाल**

डॉ.सोनारे यांचे संशोधन हे प्रयोगशाळेतील बंद खोलीतील नसून प्रत्यक्ष रुग्णांच्या अनुभवातून आलेले आहे. त्यांचे प्रमुख संशोधन विषयांमध्ये पंचकर्म आणि जीवनशैली व्यवस्थापन, आजच्या धकाधकीच्या जीवनात आहार, झोप, तणाव यामुळे शरीरातील दोषांचे संतुलन कसे बिघडते आणि त्यात पंचकर्माची सहाय्यक भूमिका काय असू शकते? यावर त्यांचे दीर्घ निरीक्षणात्मक लिखाण आहे, स्थानिक वनौषधींचे जतन आणि वापर , विदर्भातील परिसरात उपलब्ध असलेल्या



वनौषधी, त्यांची ओळख, त्यांचे पारंपारिक उपयोग आणि त्यांचे शास्त्रीय वेर्लीशपींरींळेप करणे, यासाठी ते सातत्याने कार्य करतात, समग्र आरोग्य, आयुर्वेदाला आधुनिक जीवनशैलीशी कसे जोडता येईल, हा त्यांच्या संशोधनाचा गाभा आहे. एकाच लक्षणाकडे न पाहता, आहार, विहार, मन आणि ऋतु यांचा एकत्रित विचार करणे, हीच संकल्पना ते मांडतात.

**जागतिक स्तरावर दखल**

याच संशोधन वृत्तीची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली आहे. ११ वे जागतिक आयुर्वेद संमेलन आणि आरोग्य एक्स्पो २०२६ हे ओडिशाच्या भुवनेश्वर येथे त्यांचा ॲबस्ट्रॅक्ट आयडी एबी१०२४ हा मौखिक सादरीकरणासाठी तात्पुरत्या स्वरुपात निवडल्या गेला आहे. जागतिक आरोग्यासाठी एकात्मिक आयुर्वेद ही या परिषदेची मुख्य थीम आहे. १० ते १३ डिसेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या या परिषदेत जगभरातील तज्ज्ञ, संशोधक आणि वैद्य एकत्र येणार आहेत. त्यामध्ये डॉ.सोनारे यांना आपले संशोधन मांडण्याची संधी मिळणे, ही केवळ त्यांचीच नव्हे, तर संपूर्ण विदर्भातील आयुर्वेद समुदायासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या या निवडीसोबत त्यांना प्रतिनिधी नोंदणी मध्ये ५०% सवलत देखील देण्यात आली आहे. डॉ.सोनारे म्हणतात, 'आयुर्वेद हा फक्त औषध देण्यापुरता नाही, तो जगण्याची पद्धत शिकवतो. माझे प्रत्येक पेपर हे रुग्णांच्या सेवेतूनच तयार झालेले आहे. त्यांच्या पुढील संशोधन कार्यास आणि भुवनेश्वर येथील सादरीकरणास मनःपूर्वक शुभेच्छा!

# परिचारिकांना महिन्याला आठ सुट्या द्या : राज्य शासनाच्या धर्तीवर ४० तासांचा आठवडा करा

**परिचारिका संघटनेने बीएमसीचे लक्ष वेधले**

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे साडेचार हजार परिचारिकांना राज्य शासनातील परिचारिकांप्रमाणे दरमहा किमान आठ सुट्ट्या मिळाव्यात, या मागणीवरून परिचारिका संघटना आणि महापालिका प्रशासन यांच्यातील संघर्ष अद्याप कायम आहे. या प्रश्नावर नुकतीच महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपायुक्त शरद उघडे यांच्या अध्यक्षतेखाली चार परिचारिका संघटनांसोबत चर्चा झाली. मात्र या बैठकीत कोणताही ठोस तोडगा निघू शकला नाही.

परिचारिकांचे प्रश्न औद्योगिक न्यायालयात प्रलंबित असून न्यायालयाच्या सामोपचाराने मार्ग काढण्यासाठी मध्यस्थ नियुक्त केला आहे. मध्यस्थाने तीन संघटनांच्या प्रतिनिधींकडून प्राथमिक माहिती घेतली असून पुढील सुनावणी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

पालिका रुग्णालयातील परिचारिकांना महिन्याला आठ सुट्ट्या देण्याची मागणी पुन्हा एकदा प्रशासनासमोर मांडली आहे.

# तरुण तेजपाल गोवा न्यायालयात शरण : १० वर्षांच्या कारावासासाठी रवानगी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पणजी** – तहलकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांनी २०१३ च्या लैंगिक अत्याचार प्रकरणात १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा भोगण्यासाठी सोमवारी गोवा न्यायालयात आत्मसमर्पण केले.

२५ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने तेजपाल यांना तीन आठवड्यांच्या आत शरण येण्याचे निर्देश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. आलोक अराधे यांच्या खंडपीठाने शरण येण्यापासून सूट देण्याची त्यांची याचिका फेटाळून लावली होती. त्यानंतर तेजपाल यांनी म्हापसा येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात आत्मसमर्पण केले. तेथून त्यांना उत्तर गोव्यातील कोलवाळ येथील मध्यवर्ती कारागृहात पाठवण्यात आले.

# 'दुष्काळाचे संकट दूर होऊ दे अन...'

**अंजनी ते तासगाव पायी प्रवास करत तासगावच्या गणरायाच्या चरणी रोहित पाटलांचं साकडं**

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**तासगाव** – तासगाव-कवठेमहांकाळसह संपूर्ण महाराष्ट्रावरील दुष्काळाचे संकट दूर व्हावे, शेतकऱ्यांच्या शेतात पुन्हा हिरवाई फुलावी आणि बळीराजाच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, यासाठी तासगावचे आमदार रोहित पाटील अंजनी ते तासगाव हा जवळपास २५ किलोमीटरचा पायी प्रवास करायला सुरुवात केली आहे. या पायी प्रवासादरम्यान दुष्काळाच्या वेदना घेऊन रोहित पाटील तासगावच्या गणरायाच्या चरणी साकडे घालणार आहेत. शेतकऱ्यांना मुबलक पाणी मिळावे, मुक्या जीवांच्या वाट्याला चारा-पाणी यावे आणि प्रत्येक शेतकरी कुटुंबाच्या आयुष्यात सुख-समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना ते गणरायाकडे करणार आहेत. दरम्यान, तासगाव संस्थानचा रथोत्सवही आज होत असल्याने आमदार रोहित पाटील यांच्या या पायी पदयात्रेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |










